# प्रतिज्ञा पत्र

'सांजवात' या आत्मचरित्रातील सामाजिकता आणि वाङ्मयीन गुणवत्ता या विषयां वरील सदरची प्रबंधिका मी शिवाजी विद्यापीठाच्या एम. फिल. ( मराठी ) पदवी परीक्षेसाठी लिहिली आहे. ही प्रबंधिका अथवा तिचा कोणताही भाग मी अन्यत्र कोठेही कोणत्याही परीक्षेसाठी सादर केलेला नाही.

( विष्णू बापू कांबळे )
अभ्यासक

कोल्हापूर ।
दिनांक : १४ : १२ : १९९३ .

# प्रमाणपत्र

प्रमाणित करण्यात येते की प्रा. विष्णू बापू कांबळे, यांनी 'सांजवात' या आत्मचरित्रातील सामाजिकता, आणि वाङ्मयीन गुणवत्ता, या विषयावरील प्रबंधिकेचे संशोधन कार्य समाधानकारकरित्या पूर्ण केले आहे.

प्रा. विष्णू बापू कांबळे यांनी माझ्या मार्गदर्शनाखाली स्वतंत्ररित्या ही प्रबंधिका लिहिली असून ती इतर कोणत्याही विद्यापीठातील कोणत्याही अन्य परीक्षेसाठी सादर केलेली नाही.

सदरची प्रबंधिका शिवाजी विद्यापीठाच्या एम्. फिल्. ( मराठी ) पदवी परीक्षेसाठी सादर करण्यास माझी अनुमती आहे.

प्रा. डॉ. पी. व्ही. कुलकर्णी,
प्रपाठक, मराठी विभाग प्रमुख,
देवचंद कॉलेज, अर्जुननगर,
कोल्हापूर
(मार्गदर्शक )

स्थळ : अर्जुननगर .
दिनांक : १४ : १२ : १९९३ .

# ऋण निर्देश

जीवनातील प्रत्येक माणसाचे अनुभव विश्व भिन्न असते. विशेषत: स्त्रियांच्या जीवनाला अनन्यसाधारण असे महत्व असते. स्त्री विश्वात प्रामुख्याने उपेक्षित स्त्री जीवन आणि कृतार्थ स्त्री जीवन हे प्रामुख्याने दोन भाग पडतात. उपेक्षित स्त्री जीवन हा अभ्यासाचा जरुर विषय आहे पण त्याच बरोबर उपेक्षित नसलेल्या पण कृतार्थ जीवन जगलेल्या स्त्री जीवनासही वेगळ्या पध्दतीचे महत्व असते.

आनंदीबाई शिर्के यांच्या ' सांजवात ' आत्मचरित्राची मला प्रथम पासूनच उत्कंठा होती. म्हणूनच आदरणीय गुरुतुल्य डॉ.ल.रा.नसिराबादकर, मराठी विभागप्रमुख ,शिवाजी विद्यापीठ,कोल्हापूर यांच्या सल्ल्यानुसार मी ' सांजवात ' या आत्मचरित्रातील सामाजिकता आणि वाङ्.मयीन गुणवत्ता या शोध प्रबंधिकेचा अभ्यास करण्यास प्रवृत्त झालो. सरांचे मला वेळोवेळी बहुमोल असे सहकार्य लाभले.

माझ्या या प्रबंधिकेचे मार्गदर्शक आदरणीय गुरुवर्य डॉ.पी.व्ही. कुलकर्णी यांचे माझ्यावर अनंत ऋण आहेत. आपल्या शरीर प्रकृतीची तमा न बाळगता त्यानी मला वेळीवेळी मार्गदर्शन केले ते शब्दातीत आहे.त्यांच्या मौलीक मार्गदर्शनामुळेच मी आज प्रबंधिका सादर करु शकत आहे.

आदरणीय पितृतुल्य शिक्षणमहर्षि,शिक्षणतज्ज्ञ,प्राचार्य एम.आर. देसाई यांची तर माझ्यावर स्वत:च्या मुलाप्रमाणे माया,केली त्यांनी मला सतत अभ्यासक बनवले. त्यांच्या ऋणातून मला उतराई व्हायचे नाही.

माझ्या महाविद्यालयाचे प्राचार्य मा.सी.आर.गोडसे सर यांनी प्रेमाने प्रसंगी दटावून मला लिखाणास प्रवृत्त केले,त्यांचेही माझ्यावर ऋण आहेत. त्याचप्रमाणे माझ्या शैक्षणिक जीवनाला दिशा देणारे,मदत करणारे मा.डॉ.डी.बी.जयदीप यांचे मला वेळोवेळी मार्गदर्शन लाभले यांचे आभार

मानण्यास माझ्याकडे शब्दच नाहीत. गोखले कॉलेज, मराठी विभागप्रमुख प्रा.मोहन पवार, सहृदय श्री जयंवत ठहटकर ,अधिक्षक,शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर माजी मुख्याध्यापक एस.एस.कुलकर्णी, दैनिक सकाळ ,नाशिकचे कार्यकारी संपादक उत्तम कांबळे, डॉ.रविंद्र ठाकूर, अधिव्याख्याते,शिवाजी विद्यापीठ,कोल्हापूर, प्रा.शशिकांत चौधरी,न्यू कॉलेज, कोल्हापूर व एन.जी.कांबळे यांच्याशी अधून - मधून झालेली चर्चा, माझ्या गोखले कॉलेजमधील माझ्या सहकारी मित्राचे प्रोत्साहन, गोखले कॉलेजचे ग्रंथपाल, ग्रंथालय कर्मचा-यांनी केलेली मदत यांच्यामुळेच हे लेखन पूर्ण झाले.

माझी पत्नी सौ.रेखा हिचा सततचा पाठपुरावा व आई व बंधू यांच्या कृपेमुळेच मी ही प्रबंधिका पूर्ण करु शकलो. या सर्वांचा मी ऋणी आहे.

श्री.बाळकृष्ण रा.सावंत ,कोल्हापूर यांनी या प्रबंधिकेचे टंकलेखन करुन दिल्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे.

कोल्हापूर - ( प्रा.विष्णू कांबळे )

ता. : २४ : १२ :१९९३

# भूमिका

मराठी साहित्याच्या प्रांगणात अनेक वाङ्‌मय प्रकार दृष्टीपथात येतात. त्यातील आत्मचरित्र हा एक महत्वाचा असा आकृतिबंध आहे. या आकृतिबंधाला समक्षतेचे एक परिमाण असते ते केवळ कल्पनेच्या पातळीवरचे नसते तर आत्मचरित्रकाराच्या प्रामाणिकपणाचे व निकोपणाचे त्यातून दर्शन घडते.

पुरुषांनी जशी आत्मचरित्रे लिहिली आहेत तशीच स्त्रियांनी देखील स्त्रियांच्या आत्मचरित्रांत आनंदीबाई शिर्के यांच्या जीवन कथे बरोबरच सामाजिक अनुभवही आपणाला पहावयास सापडतात. त्याचप्रमाणे ` सांजवात ` ची वाङ्‌मयीन गुणवत्ता देखील वैशिष्टयेपूर्ण आहे. कुठे केलेला न आढळल्याने या शोध-प्रबंधिकेतून ` सांजवात ` या आत्मचरित्रातील सामाजिकता वाङ्‌मयीन गुणवत्ता यांचा शोध घेण्याचा हा प्रयत्न आहे.

## पूर्वाभ्यासाचे स्वरुप --

` सांजवात ` या आत्मचरित्राचा विचार याबाबत आधी झालेला म्हणजे डॉ.द.भि.कुलकर्णी यांनी ` ललित ` मे १९७३ ` स्त्रियांचे चरित्र आत्म - चरित्रपर लेखन ` प्रतिष्ठान मार्च १९७१, वसंत दावतार यांचा ` सांजवात ` कौटुंबिक जीवनांतील हर्षामर्ष व्यक्त करणारे ` आत्मकथन ` हा लेख ` आलोचना ` एप्रिल १९७३ कुंदा पारसनिस यांचा ` युगवाणी ` एप्रिल-मे १९७३. सुधा देशपांडे ललित ( मुंबई ) जानेवारी १९८८ असे कांही स्फुट लेख तर ` समकालीन साहित्य प्रवृत्ती आणि प्रवाह संपादन मृणालीनी पाटील । ज्योती लांजेवार , ` मराठी लेखिका चिंता आणि चिंतन ` - भालचंद्र फडके असे कांही ग्रंथ तर विमल भालेराव यांचा ` आधुनिक मराठी वाङ्‌मयातील स्त्रियांची

आत्मचरित्रे - एक अभ्यास ( १९१० ते १९७५ ) संशोधित प्रबंधित यातून ` सांजवात ` बाबत त्या त्या अनुषंगाने स्फुट विचार आलेले आहेत पण ` सांजवात ` आत्मचरित्राच्या अनुषंगाने आत्मचरित्र या आकृतिबंधाच्या माध्यमातून ` सांजवात ` या आत्मचरित्रातील सामाजिकता आणि वाङ्मयीन गुणवत्ता या बाबत सविस्तर पणे कुठे विचार झालेला न आढळल्याने या प्रबंधिकेतून ` सांजवात ` मधील सामाजिकता व वाङ्मयीन गुणवत्ता यांचा शोध घेण्याचा प्रयत्न केला आहे.